QRickit

0224CH04

# 4 सावलीची गोष्ट(तोगालू)




गावातल्या जत्रेत **नकुल** आणि त्याच्या मित्रांनी तोगलू गोम्बेयाता नावाचा कठपुतळ्यांच्या सावल्यांचा खेळ पाहिला। त्या सावल्या बघून मुले गुंग झाली।

त्यांनाही अशा सावल्या पाडायला शिकायचे होते। त्यामुळे त्यांनी हाताच्या बोटांनी आकार तयार करून भिंतीवर प्राण्यांच्या आकाराच्या सावल्या पाडल्या। तुम्हालाही अशा सावल्या शिकता येतील।



कर्नाटकात प्रचलित असलेल्या तोगलू गोम्बेयाता नावाच्या कठपुतळ्यांच्या सावल्यांचा खेळ याबद्दल मुलांना माहिती द्या। या बाहुल्यांच्या माध्यमातून भारतीय पुराणकाव्यातील कथा सांगितल्या जातात। मुलांना त्यांनी पाहिलेल्या बाहुल्यांच्या खेळाविषयीचे अनुभव सांगू द्या।



© NCERT not to be republished

## करून बघू या

वेगवेगळ्या प्राण्यांच्या सावल्या पाडून आणि त्यांचे आवाज काढून एक नाटुकले सादर करा।

## चला बोलू या

A. तुम्ही तुमची स्वतःची सावली पाहिली आहे का? किंवा झाड, कुत्रा, गाय किंवा दुसऱ्या कुठल्याही प्राण्याची सावली पाहिली आहे का?

B. आपल्याला सावली केव्हा दिसते?

C. सावली नाहीशी कधी होते?

### सावल्यांची गंमत



तुमच्या अवतीभोवती असलेल्या वस्तूंवर विजेरीचा (टॉर्च वा बॅटरी) प्रकाश पाडा आणि त्यांच्या सावल्यांचे आकार बारकाईने बघा।

A. विजेरीची स्थिती बदलल्यावर सावली लहान-मोठी होते का?

B. दिवसाच्या कोणत्या वेळी तुमची सावली सर्वात लांब असते?

C. दिवसाच्या कोणत्या वेळी तुमची सावली सर्वात आखूड असते?

© NCERT not to be republished

दिवसाच्या निरनिराळ्या वेळी पडणाऱ्या सावलीबद्दल आणि त्याच्या कारणांबद्दल मुलांशी चर्चा करा।





## गिरवू या

A. तुमच्या अवतीभोवती असलेल्या वस्तूंचे आकार गिरवून काढा। उदा। खोडरबर, पान, काडेपेटी, गिरमिट, रंगीत पेन्सिल इ।



B. गिरवल्यावर मिळणाऱ्या आकारांची चित्रे काढा।

© NCERT not to be republished



## विचार करू या

यासारखाच गिरवलेला आकार असणाऱ्या वस्तूंची नावे सांगा:

A. बाटलीचे बूच

B. खोडरबर

## लपंडाव

वर्तुळ ◯ आणि आयत ▭ लपंडाव खेळत आहेत। आयत वर्तुळापासून लपतो आहे।




©NCERT not to be republished




© NCERT not to be republished

## ते सर्वजण आता एकत्र खेळत आहेत

A. वर्तुळाला ◯ घड्याळ, चेंडू यात लपता येईल, ________, ________.

B. आयताला ▭ बुटाच्या खोक्यात किंवा फोटोच्या चौकटीत लपता येईल, ________, ________.

C. पण त्रिकोण △ आणि चौरस □ मात्र गोंधळलेले आहेत कारण त्यांना कुठे लपावे ते कळत नाही। त्यांना लपण्याच्या जागा सुचवा।

i. त्रिकोणाला △ या ठिकाणी लपता येईल ________, ________.

ii. चौरसाला □ या ठिकाणी लपता येईल ________, ________.

## गालिचा रंगवा



त्रिकोण लाल रंगाने रंगवा।



वर्तुळ हिरव्या रंगाने रंगवा।



आयत पिवळ्या रंगाने रंगवा।



चौरस निळ्या रंगाने रंगवा।



## वेगवेगळे आकार वापरून नक्षी तयार करा आणि रंगवा।

© NCERT not to be republished



## कोपरा पकडा!

नवीन आणि त्याचे मित्र खेळ खेळत आहेत। नवीन भिंतीकडे तोंड करून उभा आहे आणि टाळ्या वाजवत आहे। तो टाळ्या वाजवत असताना त्याचे मित्र टेबलाभोवती पळत आहेत। त्याने टाळ्या थांबवल्या की सर्वजण थांबतात। जो टेबलाच्या कोपऱ्यापाशी नाही तो आउट होतो। मग तो मुलगा टाळ्या वाजवेल आणि खेळ चालू राहील।




## चित्र बघा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या।

A. टेबलाच्या कोपऱ्यापाशी उभ्या असलेल्या मुलांची नावे सांगा।

B. आता यानंतर कोण टाळ्या वाजवेल ते सांगा पाहू?

C. वासिम कुठे उभा आहे?

D. हा खेळ गोल टेबलाभोवती खेळता येईल का? का येईल किंवा का नाही येणार?

E. आपल्या भोवतीच्या टोकदार कडा असणाऱ्या वस्तूंची नावे सांगा।

F. आपल्या भोवतीच्या बऱ्याच वस्तूंच्या कडा गोलाकार असतात। त्यातल्या काही खाली दाखवल्या आहेत। तुमच्या अवतीभोवती असलेल्या अशा वस्तू शोधा आणि त्यांची नावे सांगा









© NCERT not to be republished



## विचार करू या

A. गोलाकार बाजू असलेल्या वस्तूंना किती कोन असतीलॽ

B. सरळ आणि गोलाकार दोन्ही प्रकारच्या बाजू असलेल्या वस्तूंची नावे सांगा।

## ओरिगामीची गंमत!



A. एक कागद घ्या। त्याला घडी घालून चौरसाकृती करा।

B. त्याला ___ कोन आणि ___ बाजू आहेत।

C. चित्रात दाखवल्याप्रमाणे दोन कोन जोडणारी अर्धी घडी घाला।

D. तुम्हाला जो आकार मिळेल, त्यावर बरोबरची खूण ✓ करा।

i. ● ii. ■ iii. ▲

E. या आकाराला ___ कोन आणि ___ बाजू आहेत।

F. आता आणखी एक घडी घालून त्रिकोणाकृती करा आणि पुन्हा ती घडी उघडा।

G. आता या त्रिकोणाचे दोन कोन दुमडून छोटे त्रिकोण करा।

H. आता एकूण किती कोन झालेॽ ___

I. चित्रात दाखवल्याप्रमाणे तिसरा कोन वरती दुमडा आणि नाक, डोळे काढा।

तुमचा कागदी कुत्रा तयार! 

4 बाजू असलेला आकार तयार होईल अशा पद्धतीने तुम्हाला चौरसाच्या घड्या घालता येतील काॽ आता त्याला किती कोन आहेतॽ

मुलांना त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तू बघून त्यांच्या कडा, कोन आणि बाजूंची संख्या मोजायला सांगा।



© NCERT not to be republished



# आकृतिबंध

A. निरनिराळ्या आकाराच्या वस्तूंचे ठसे उमटवून चित्र तयार करा। उदा। बाटलीचे बूच, खोडरबर, पेन्सिल, नाणे इ।



B. राधा आपल्या हातांवर मेंदी लावत आहे। मेंदीची नक्षी किंवा आकृतिबंध काढण्यासाठी तुम्हाला तुमच्या हाताचा आकार कागदावर गिरवून काढता येईल।





© NCERT not to be republished

## करून बघू या

नित्या पानांशी खेळत आहे आणि आकृतिबंध तयार करत आहे।



तुम्हीही काही पाने गोळा करा आणि आकृतिबंध तयार करा। पानाची एक बाजू रंगवा आणि खाली दिलेल्या जागेत त्याचा ठसा उमटवा।

© NCERT not to be republished

## प्रकल्प कार्य

घरातील मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे आकार कापून, चिकटवून घराच्या किंवा वर्गाच्या भिंतीवर लावण्यासाठी शोभाचित्र तयार करा।

## खालील आकृतिबंध पुढे वाढवा।

A. 

B. 

C. 

D. 

E. 

F. 

G. AB BC CD

H. AA BB CC DD EE

I. 

© NCERT not to be republished

किक्कू सशाने चौथ्या फरशीवर उडी मारली। पण पुढची उडी कुठे मारायची हे तो विसरला। ◯ योग्य फरशीवर गोल काढून त्याला मदत करा।

1, 4, _____, _____, _____, _____, _____, _____




किक्कूच्या आईने सहाव्या फरशीवर उडी मारली। पुढील योग्य त्या फरशीवर फुली काढून तिला × मदत करा।

1, 6, 11, _____, _____, _____, _____, _____



## करून बघू या

**खाली दिलेले संख्यांचे आकृतिबंध पुढे वाढवा।**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| A. 5, 10, 15, | | | | | |
| B. 7, 14, 21, | | | | | |
| C. 1, 7, 13, | | | | | |

© NCERT not to be republished